# कुलगुरुपदासाठी इच्छुकांच्या नावांची चर्चा

कोल्हापूर, ता. ३ : शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुपदासाठी निवड प्रक्रिया सुरू झाली आहे. या निमित्ताने विद्यापीठात चर्चेला उधाण आले आहे. इच्छुकांची नावे चर्चेत आहेत. विद्यमान कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांची मुदत १७ जूनला संपणार असून त्यानंतर प्रभारी कुलगुरूंकडे सूत्रे दिली जातील. नव्या कुलगुरूंचा शोध सुरू झाला असून २ जुलैपर्यंत अर्ज करण्याची मुदत आहे.

कुलगुरू पद अत्यंत प्रतिष्ठेचे असते. त्यामुळे या पदासाठी राज्यभरातून अनेक नावे चर्चेत असतात. यंदाही या पदासाठी चर्चेत काही नावे आहेत. विभागप्रमुख डॉ. भारती पाटील, विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे प्रमुख डॉ. पी. एस. पाटील, सांगली येथील प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे, पर्यावरण विभागाचे प्रमुख पी. डी. राऊत हे इच्छुक असल्याची चर्चा आहे. मात्र जोपर्यंत यातील कोणीही अर्ज करणार नाही तोपर्यंत ही केवळ चर्चाच असणार आहे. कुलगुरू पदासाठी २ जुलैपर्यंत अर्ज करणे बंधनकारक आहे. यासाठी शोध समितीची नियुक्ती झाली असून त्यांनी प्रक्रिया सुरू केली आहे.



# कुलगुरू पदाच्या अर्ज प्रक्रियेला आजपासून प्रारंभ

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचे विद्यमान कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचा कार्यकाळ येत्या १७ जून रोजी पूर्ण होत आहे. त्यांच्या जागी नवीन कुलगुरूंची नियुक्ती करण्यासाठी बुधवारी जाहीरात प्रसिध्द झाली आहे. इच्छुकांनी विहीत नमुन्यात ऑनलाईन आणि ऑफलाईन अर्ज भरून चार प्रतित २ जुलैपर्यंत पाठवणे बंधनकारक आहे.

शिवाजी विद्यापीठाचे नूतन कुलगुरू नियुक्ती करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. या प्रक्रियेसाठी राज्यपालांनी त्रिस्तरीय शोध समिती नेमली आहे. या शोध समितीचे संपर्क अधिकारी (नोडल ऑफिसर) म्हणून केंद्रीय मनुष्यबळ संचालनालयाचे अतिरिक्त संचालक आर. के. जैन यांची नियुक्ती केली आहे. ही शोध समिती महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रानुसार कुलगुरू पदासाठी विहित केलेली आर्हता तपासून पात्र व्यक्तीच्या नावाची शिफारस राज्यपालांकडे करेल. कुलगुरू पदासाठीच्या अर्जाचा नमुना शिवाजी विद्यापीठाच्या **www.unishivaji.ac.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तरी इच्छुकांनी विहीत नम्युन्यात आपला अर्ज भरून, ॲडीशनल डायरेक्टर, डायरेक्टॉरेट ऑफ एच. आर. डी., रूम नंबर २४८, डी. आर. डी. ओ. भवन, न्यू दिल्ली-११००११ या पत्त्यावर पाठवायचा आहे.

# कुलगुरु निवड प्रक्रियेस प्रारंभ

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या नूतन कुलगुरू निवडीसाठी विद्यापीठातर्फे प्रक्रिया राबविण्यात येत आहे. कुलगुरू पदासाठी इच्छुकांकडून अर्ज मागविण्यात आले असून दोन जुलैपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन शोध समितीतर्फे करण्यात आले आहे.

विद्यमान कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचा कार्यकाल १७ जून रोजी संपत आहे. त्यांच्या जागी नवीन व्यक्तीची नियुक्ती करण्यासाठी शोध समिती कार्यरत आहे. कुलपती तथा राज्याचे राज्यपाल यांनी या विद्यापीठाच्या कुलगुरू पदासाठी यथोचित व्यक्तीची शिफारस करण्यासाठी त्रिसदस्यीय शोध समिती तयार केली. समिती कुलगुरू पदासाठी आवश्यक अहर्ता व अनुभव या अटींची पूर्तता करणाऱ्या तसेच हे आव्हानात्मक काम करण्यास इच्छुक असलेल्या ज्येष्ठ शिक्षण तज्ज्ञांकडून नाम निर्देशन मागवत आहे. या बाबतची माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर देण्यात आलेली आहे. समितीतर्फे नवी दिल्ली येथील शास्त्रज्ञ आर. के. जैन यांची संपर्क अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे. संबंधित उमेदवारांनी दोन जुलैपूर्वी जैन यांच्याकडे विहीत नमुन्यात अर्ज करावयाचे आहेत.

# SUK invites applications for new VC

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) has invited application for recruiting new vice-chancellor (VC), a post that will become vacant after the 5-year tenure of incumbent VC Devanand Shinde comes to an end on June 17.

Governor Bhagat Singh Koshyari, who is also the chancellor of the universities, have set-up a three member panel to recommend names for the post. R K Jain is the nodal officer for recruitment process. In January, the management council and senate of the SUK had nominated director of National Chemical Laboratory Ashwinkumar Nangia as one of the members of the search committee. TNN

पुढारी

# शिवाजी विद्यापीठ कुलगुरू निवड प्रक्रिया सुरू

## इच्छुकांकडून अर्ज मागविले; तीन सदस्यांची निवड समिती

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांची १७ जून रोजी मुदत संपत असून नव्या कुलगुरूंसाठी निवडीची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. नव्या कुलगुरू निवडीसाठी तीन सदस्यीय निवड समिती तयार केली असून इच्छुकांकडून दि. २ जुलैपर्यंत अर्ज मागविण्यात आले आहेत.

येत्या दि. १७ जून रोजी शिंदे यांची कुलगुरूपदाची मुदत संपत आहे. राज्य विद्यापीठ अधिनियमानुसार ही निवड केली जाणार आहे. त्यासाठी राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेचे संचालक डॉ. अश्विनीकुमार नागिया हे कुलगुरू शोध समितीचे अध्यक्ष आहेत. याशिवाय व्यवस्थापन परिषद, व विद्यापरिषदेने निवड केलेले सदस्य तसेच राज्यपाल नियुक्त सदस्य असे तीन सदस्य या समितीवर आहेत.

देशभरातून कुलगुरू निवडीसाठी समितीने अर्ज मागविले आहेत. विशिष्ट नमुन्यात अर्ज दाखल करायचा आहे. या अर्जाबरोबरच त्यांना विद्यापीठासाठी आपले व्हिजन काय असेल, तेही अर्जाबरोबर सादर करायचे आहे. ज्यांनी अर्ज दाखल केला आहे, त्यांच्या कार्याविषयी माहिती असणाऱ्या तीन नामांकित व्यक्तींची नावे संपर्क व माहितीसह सादर करण्याचे बंधन आहे. केंद्रीय मनुष्यबळ संचलनालयाचे अतिरिक्त संचालक आर. के. जैन यांची संपर्क अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

### कार्यभार कोणाकडे?

डॉ. शिंदे यांची मुदत दि. १७ जुन रोजी संपत आहे. नव्या कुलगुरूंसाठी दि. २ जुलैअखेर अर्ज मागविण्यात आले आहेत. त्यामुळे या निवड प्रक्रियेला वेळ लागणार आहे. दरम्यानच्या काळात तरतुदीनुसार विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे कुलगुरूपदाचा कार्यभार राहील किंवा दुसऱ्या विद्यापीठाच्या कुलगुरूंकडे पदभार सोपविला जाईल. सध्याच्या लॉकडाऊनच्या काळात अन्य विद्यापीठाच्या कुलगुरूंकडे पदभार सोपविण्याची शक्यता कमी असल्याचे विद्यापीठ वर्तुळात बोलले जात आहे.

### अशी होणार निवड प्रक्रिया

निवड समितीकडे आलेल्या अर्जाची समितीकडून छाननी केली जाईल. यानंतर २० जणांच्या नावांची यादी तयार केली जाईल. यातून ५ जणांची नावे पाठवण्यात येऊन त्यातून एका व्यक्तीची कुलगुरूपदावर निवड केली जाईल.

विद्यापीठातून शिक्षण घेऊन अन्य संस्थेत काम केलेल्या काही लोकांची आजपर्यंत विद्यापीठात कुलगुरूपदासाठी निवड झाली आहे; पण स्थानिकांना त्या तुलनेत कमी संधी मिळाली आहे. त्यामुळे यावेळी तरी संधी मिळण्यासाठी काहींनी तयारी सुरू केली आहे.

लोकमत

**शिवाजी विद्यापीठ :** आठजणांची नावे चर्चेत; अर्जाची प्रक्रिया सुरु; २ जुलैपर्यंत मुदत राहणार

# कुलगुरुपदासाठी इच्छुक लागले तयारीला


लोकमत न्यूज नेटवर्क,

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुपदासाठी इच्छुक असणाऱ्या प्राचार्य, प्राध्यापकांच्या तयारीने वेग घेतला आहे. यासाठी प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे, पी. एस. पाटील, दिलीप पाटील, भारती पाटील यांच्यासह आठजणांची नावे चर्चेत आहेत. अर्जाची प्रक्रिया बुधवारपासून सुरु झाली आहे. २ जुलैपर्यंत मुदत आहे.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेली परिस्थिती पाहता शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुपदाची निवड प्रक्रिया पुढे ढकलण्यात येईल, अशी चर्चा सुरु होती. मात्र, त्रिसदस्यीय शोध समितीने अर्ज मागविण्याची प्रक्रिया सुरु केल्याने या चर्चेला पूर्णविराम मिळाला. सध्या विद्यापीठातील विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील, मानव्यशास्त्र विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. भारती पाटील, पर्यावरणशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. पी. डी. राऊत, भौतिकशास्त्र विभागातील प्राध्यापक आणि सध्या उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांचे 'ओएसडी' असणारे राजेंद्र सोनकवडे, सांगलीतील भारती विद्यापीठाच्या डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे, मुंबई विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक प्राचार्य डॉ. दिलीप पाटील, कऱ्हाड येथील सद्गुरु गाडगे महाराज महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन राजमाने, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे सहसचिव (अर्थ) प्राचार्य डॉ. आर. व्ही. शेजवळ यांच्या नावांची चर्चा आहे. दरम्यान, विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात काम करणारी आणि विद्यापीठातील अडचणी, समस्यांची माहिती असणाऱ्या व्यक्तीची कुलगुरुपदी निवड व्हावी, अशी मागणी शिवाजी विद्यापीठ आजी-माजी विद्यार्थी कृती समितीचे अध्यक्ष डॉ. प्रवीण कोडोलीकर यांनी केली आहे. तसे निवेदन राज्यपाल, मुख्यमंत्री आणि उच्च व तंत्रशिक्षणमंत्र्यांना बुधवारी ई-मेलद्वारे पाठविले.

## अर्जांचे अद्ययावतीकरण करण्याची तयारी सुरु

इच्छुक असलेल्या प्राचार्य, प्राध्यापकांनी गेल्या दीड ते दोन महिन्यांपासून तयारीला सुरुवात केली होती.इच्छुक असलेल्यांपैकी काहींनी मागीलवेळी असलेले निकष, पात्रता आदींनुसार अर्ज, बायोडाटा, व्हीजन तयार केले आहे. शोधसमितीकडून जाहिरात प्रसिद्ध झाल्याने संबंधित इच्छुकांनी अर्जांच्या अद्ययावतीकरणाचे (अपडेट) करण्याची तयारी सुरु केली आहे.



पुढारी

# ग्रामीण शब्दफुलांच्या बागेतील कन्या

**ज्येष्ठ लेखिका, शिक्षणतज्ज्ञ प्राचार्या अनुराधा गुरव यांचे नुकतेच निधन झाले. त्यानिमित्त...**

समाजात काही माणसे आपल्या गुणवत्तेचा, बुद्धिमत्तेचा, ज्ञानाचा, अनुभवांचा दुसऱ्यांच्या जीवनातील दुःख दूर करण्यासाठी उपयोग करतात. आपल्या बुद्धिमत्तेच्या स्पर्शाने सामान्यांना संपन्न करतात. याचे उत्तम उदाहरण म्हणजे प्रा. अनुराधा गुरव!

प्रा. अनुराधा गुरव ऊर्फ कु. सुमन पाटील यांचे वडील रंगराव मल्हार ऊर्फ आबासाहेब पाटील हे सोलापूर जिल्ह्यातील जाणते काँग्रेस नेते. अनुराधा गुरव या ज्येष्ठ कन्येवर त्यांनी उत्तम संस्कार केले. या गुणी मुलीने एखाद्या टीप कागदासारखे आपल्या वडिलांच्या व्यक्तिमत्त्वाचे पैलू टिपण्याचा, आत्मसात करण्याचा प्रयत्न केला. प्रा. अनुराधा गुरव यांचे काका पोलिसपाटील होते. काकांच्या मागे त्या उभे राहून बालपणी त्यांच्या तक्रारी ऐकत असत. त्यांचे घर म्हणजे एकूणच लोकांच्या तक्रारी आणि त्यांचे निराकरण करणे म्हणजे एक प्रकारचे कौटुंबिक न्यायालयच.



लग्नानंतर प्राचार्य डॉ. गुरव सरांच्या प्रेमळ व समंजस स्वभावामुळे लेखिकेला तरुण वयात सामाजिक कार्य करता येऊ लागले. त्यांना वयाच्या पस्तीशीनंतर विधी सेवा प्राधिकरण सदस्य म्हणून कौटुंबिक जीवनातील अनेक परीने गुंते सोडविण्याची संधी मिळत राहिली ती आजअखेर!

प्रा. अनुराधा गुरव यांचा जीवनप्रवास वेगवेगळ्या माध्यमांतून घडलेला आहे. त्यांचे अनमोल कार्य पुढील पिढीला आदर्श असे आहे. त्यांचे ग्रामीण कथासंग्रह ग्रामीण बोलीभाषेत असल्यामुळे पुस्तक वाचताना एक वेगळा अनुभव जाणवतो. त्यांची ग्रामीण कादंबरी 'खेळीया' बोलीभाषेत असल्यामुळे वाचकाला, लोकांना भावते. ग्रामीण कादंबरी वाचताना ग्रामीण भागातल्या दुनियेत घेऊन जाते. त्यांची पुस्तके वाचताना मानवी मनाचे, नात्यांसंबंधीचे सखोल व सूक्ष्म दर्शन घडते. हेच अनुभव त्यांनी दै. 'पुढारी'मधून 'गुंता सोडविताना' या सदरातून लिहिले. त्यांच्या जीवनातील आलेले अनुभव हे सामान्य लोकांपर्यंत पोहोचविण्याचे काम त्यांनी केले. समाज प्रबोधनासाठी पुस्तकरूपाने अनुभव मांडलेले आहेत. प्राप्तीच्या आनंदापेक्षा प्रयत्नाचा आनंद मोठा असतो. दवाच्या इवल्याशा थेंबात आकाशाचे प्रतिबिंब दिसते. एवढा उदात्त हेतू मनाशी बाळगून त्यांनी हे सामाजिक व्रत स्वीकारले होते. त्यांनी ५ ते ६ राज्यांमध्ये ५००० हून अधिक व्याख्याने दिली. दिग्दर्शन, अभिनय, खेळ, शूटिंग अशा विविध विषयांत त्यांना रस होता. १९६६ पासून म्हणजे गेली पन्नास वर्षे त्या साहित्यसेवा, समाजसेवा करत होत्या. लोकांच्या जीवनामध्ये एखादी पणती लावून त्यांच्या जीवनातील अंधकार दूर करण्याचा प्रयत्न त्यांनी केला. हे करत असताना अनेक विद्यार्थी त्यांनी घडविले. सर्वांना अभिमान वाटावा व त्यांचा आदर्श भावी पिढीने घ्यावा, असे सुचवावेसे वाटते.

**- सुशीलकुमार शिंदे**

माजी गृहमंत्री, भारत सरकार

पुढारी

# शिवाजी विद्यापीठ कुलगुरू पदासाठी अनेक नावे चर्चेत

## अर्ज दाखल होत नाही तोपर्यंत केवळ चर्चाच

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरूपदासाठी अर्ज मागविताच अनेक नावांची चर्चा सुरू झाली आहे. मात्र, जोवर या पदासाठी अर्ज केला जात नाही तोवर केवळ नावांची चर्चाच असणार आहे.




शिक्षण क्षेत्रात सध्या ज्या नावांची चर्चा सुरू आहे. त्यामध्ये शिवाजी विद्यापीठातील अधिष्ठाता डॉ. भारती पाटील, अर्थशास्त्र विभागाचे डॉ. विजय ककडे, विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे प्रमुख डॉ. पी. एस. पाटील, प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे, पर्यावरण विभागाचे प्रमुख डॉ. पी. डी. राऊत, पदार्थविज्ञान विभागाचे डॉ. विजय फुलारी तसेच मुंबई विद्यापीठातील डॉ. दिलीप शंकरराव पाटील यांची नावे चर्चेत पुढे आली आहेत.

लोकमत

# परीक्षांबाबत शासनाच्या आदेशाची प्रतीक्षा

लोकमत न्यूज नेटवर्क,

**कोल्हापूर :** इअंतिम वर्षाच्या परीक्षांबाबतच्या कार्यवाहीसाठी शिवाजी विद्यापीठाला राज्य शासनाच्या आदेशाची प्रतीक्षा लागली आहे. परीक्षा घेणे अथवा मागील सत्रातील गुणांवर सरासरी काढून पदवी देणे यापैकी कोणताही निर्णय झाला, तरी त्यादृष्टीने विद्यापीठाने तयारी सुरु केली आहे.

विद्यापीठाने विविध अभ्यासक्रमाच्या अंतिम सत्रातील २२५ परीक्षा दि. १ ते ३१ जुलैदरम्यान घेण्याचे नियोजन केले होते. त्यासाठी बी. ए., बी. कॉम., बी. एस्सी, एम. ए., एम. एस्सी., एम. कॉम., बीबीए, बीसीए, एमसीए, एमबीए, अभियांत्रिकी आणि इतर अभ्यासक्रमांचे एकूण ७५ हजार परीक्षार्थी आहेत. मात्र, त्यातच मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी अंतिम वर्षाची परीक्षा घेण्याऐवजी या वर्षातील विद्यार्थ्यांना झालेल्या सत्र परीक्षांतील गुणांची सरासरी काढून उत्तीर्ण करण्याची घोषणा केली. त्यावर परीक्षेबाबत निर्णय घेण्याचा अधिकार माझा असल्याचे राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी मुख्यमंत्र्यांना पत्राद्वारे कळविले आहे. त्यामुळे पुन्हा एकदा परीक्षेबाबत संभ्रमावस्था निर्माण झाली आहे.

## बैठक रद्द

अंतिम वर्षाच्या परीक्षेच्या मुद्द्यावर चर्चा करण्यासाठी सर्व कुलगुरुंची बुधवारी सकाळी ऑनलाईन बैठक आयोजित केली होती. मात्र, चक्रीवादळाच्या पार्श्वभूमीवर ही बैठक रद्द झाली, असे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी सांगितले.

## आरोग्याचा विचार करावा

विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा विचार करुन परीक्षा रद्दच्या निर्णयाला सहमती दर्शवावी, अशी मागणी आंतरराष्ट्रीय मानवाधिकार संघाचे जिल्हाध्यक्ष नीलेश सुतार यांनी केली. त्याचे निवेदन त्यांनी राज्यपालांना पाठविले आहे.